**संस्था बांधणी सहयोग योजना - २०२४-२५.**

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने **"संस्था बांधणी सहयोग योजना"** **(IBSS)** हा प्रकल्प २००७-०८ साली सुरु झाला.तीन टप्प्यात झालेल्या या योजनेत देशभरातील ३० संस्थांचा सहभाग होता. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पर्यावरण ते आरोग्य आणि महिला सबलीकरण ते ग्रामविकास अशा विविध विषयांवर काम करणाऱ्या या संस्था लोकांच्या राहणीमानावर आणि विचारांवरही मोठा परिणाम करतात. या विषयाची गरज आणि महत्त्व लक्षात घेऊन वर्ष २०२४-२५ पासून पुन्हा एकदा या प्रकल्पाची सुरवात करावी असे प्रबोधिनीने ठरविले आहे.

**उद्देश** -

आज देशभरात ८ लाखा पेक्षाही जास्त नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आहेत. आपले संथात्मक काम हे लोकांच्या फक्त गरजा भागविण्याचे नव्हे तर त्या गरजांची पूर्ती करीत असतानाच व्यक्तींनाही सबल बनविण्याचे माध्यम आहे, असा विचार करणाऱ्यांची संख्या मात्र फार तर शेकड्यात आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैचारिक प्रभाव मोठ्या प्रमाणावर आज पडताना दिसत आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा, समाजमाध्यमांच्या प्रभावाचा परिणाम देखील या स्वयंसेवी संस्थांच्या कामावर पडताना दिसत आहे. भवतालच्या या बदलाला सामोरे जाताना स्वयंसेवी संस्थांनी देखील आता कात टाकणे गरजेचे झाले आहे. आपल्या कामातून समाजावर प्रभाव पाडणाऱ्या, योग्य प्रशासकीय व आर्थिक शिस्तीत चालणाऱ्या ,समाजातील सर्व घटकांना सामावून घेत निरंतर चालणारे संस्था जीवन विकसित करणाऱ्या व नवीन बदल व समस्यांना सामोरे जात उत्तरे काढणाऱ्या संस्थांचे जाळे निर्माण करणे हे काळाची गरज झाली आहे. अशा समाजावर प्रभाव पाडणाऱ्या संस्थांचे सुदृढीकरण करणे आणि त्याद्वारे समाजात एक मूल्याधिष्ठित 'संस्था- संस्कृती' स्थिर करणे या हेतूने 'संस्था बांधणी सहयोग योजना' काम करेल.

**संस्था बांधणी अंतर्गत करण्यात येणाऱ्या बाबी**

- **प्रशिक्षण:-** विश्वस्त, सहकारी, (संस्था संचालन करण्याच्या निर्णय प्रक्रियेत असणारे), कर्मचारी यांच्या क्षमता संवर्धनाचा कालबद्ध कार्यक्रम
- **कार्यालयीन व्यवस्थापन:-** सर्व महत्त्वाच्या दस्ताऐवजाचे व्यवस्थापन, धर्मादाय आयुक्तालयासंबंधातील सर्व कागदपत्रांची पूर्तता, वार्षिक अहवाल, दैनंदिन कामकाज नोंदी या बाबतीत प्रशिक्षण
- **प्रचार प्रसिद्धी व उपक्रमांची नाविन्यता:-** उपलब्ध माध्यमांचा योग्य वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग, समाजमाध्यमांच्या वापराबाबत योग्य ते प्रशिक्षण
- **आर्थिक स्वयंपूर्णता:-** संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षमतेने चालविण्या संदर्भातील आवश्यक प्रशिक्षण, आर्थिक व कायदेशीर व्यवस्थापन व स्वयंपूर्ततेकडे वाटचाल करण्यास मदतरूप होणारी रचना लावण्यास हातभार
- **प्रकल्प व्यवस्थापन:** संस्था एखादा प्रकल्प राबवित असल्यास त्या प्रकल्पाचे योग्य व्यवस्थापन, नियंत्रण आणि मूल्यमापन यांचे प्रशिक्षण

**कालावधी:-**

वर्ष २०२४-२५ या वर्षांतर्गत सुरु होणाऱ्या या योजनेची सुरवात १ ऑक्टोबर पासून होईल. एकूण कलावधी १२ महिने ते १५ महिने